Vol 6 Issue 2 August 2016

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 2 | August - 2016

GRT Golden Research Thoughts

'पारवा' : एक धर्म-हासाचे वेदनागीत

डॉ. संजय गोविंदराव पोहरकर
प्राचार्य , समर्थ महाविदयालय, लाखनी , जि. भंडारा.



सारांश–

बालकवी या टोपण नावाने ओळखले जाणारे कवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे हे प्रामुख्याने निसर्गाशी हृदयसंवाद साधणारे व जिंवत शब्दचित्रण रेखाटणारे कवी म्हणून ओळखले जातात. कवी मनाला साधलेली सृष्टीची सायुज्यता त्यांच्या वैशिष्टयपूर्ण शब्दकळेतून सहज सुंदरतेने व्यक्त होते. जणू त्यांच्या कवितेतून निसर्गाचे प्रसन्नवदन सहज हास्य प्रगट होते. एका अर्थी सृष्टी सौंदर्याशी कवी मनाने साधलेले समर्पण त्यांच्या नितांत सुंदर शब्दकळेतून प्रगट होतांना दिसते. म्हणूनच त्यांच्या बाबतीत 'सृष्टीच झाला कवी आणि कवीच झाली सृष्टी' अशी त्यांची संक्षिप्त ओळख करून देण्यात येते.

प्रस्तावना–

बालकवीच्या गाजलेल्या कवितांपैकी 'पारवा' ही एक मराठी कवितेत स्वतंत्र्य स्थान असलेली गूढ रम्य कविता समजली जाते. या कवितेचा आशय केवळ सहा कडव्यामध्ये विस्तारलेला असून कवीने शेवटी 'अपूर्ण' अशी टीप टाकली आहे. प्रस्तुत शोध निबंधात या गूढतेचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. या गुढतेचे आकलन कवितेतील प्रतिमा सृष्टीचे नीट आकलन केल्यास होवू शकते. प्रस्तुत आकलन निश्चितच 'पारवा' कविता समजून घेण्यास उपयुक्त ठरेल.

वरील गुढतेच्या पार्श्वभूमीवरच 'पारवा' या कवितेकडे मला 'धर्म-हासाचे वेदनागीत' म्हणून पाहावेसे वाटते. सामान्य मानसांची आत्यंतिक वेदना त्यांना कदाचित संपवीतही असेल. पण असामान्यांची वेदना म्हणजे त्यांचा पुनर्जन्म असतो. भारताच्या स्वातंत्र्य लढयातील क्रांतिकारकांचे जीवन विचारात घेतले तर; त्यांच्या वाटयाला आलेल्या परकीय सत्तेच्या कटू अनुभूतीची वेदना हीच त्यांची क्रांतिकारक म्हणून प्रेरक शक्ती ठरली. 'पारवा' ही कविताही कवी मनाने घेतलेल्या कडवट जीवनानुभूतीतून अभिव्यक्त झालेली वेदना होय. मानवी जीवनातून होवू पाहणारा धार्मिक नीतिमूल्यांचा -हास, कवी मनाला अस्वस्थ करतो. कारण धर्मरक्षणातच मनुष्याच्या दीर्घकालीन स्वार्थसाधनेचे व सुखाचे रहस्य दडलेले आहे.

मनुष्य हा जेव्हा क्षणिक सुखाच्या मोहासाठी आपल्या जीवनमूल्यांचा त्याग करतो तेव्हा त्याचे विनाशाच्या दिशेनेच पाऊल पडलेले असते. वास्तविक जीवनमूल्यांच्या म्हणजेच धर्माच्या रक्षणातच व्यक्तीचे खरे हीत साठवलेले असते. त्या अर्थीच 'धर्मो रक्षती रक्षितः' हे जीवनसूत्र सांगितले आहे. 'जो धर्माचे रक्षण करेल त्यांचेच धर्मही रक्षण करेल.' हा सिद्धांत एक वैश्विक सत्य आहे. परंतु पुष्कळदा धर्म म्हणजे काय? हे जाणूनही माणसे त्यांच्या वृत्तीमूळे अधर्माचरणाला प्रवृत्त होतात व हे अधर्माचरणच त्यांना विनाशाकडे घेवून जात असते.

समाजजीवनातील ही संकुचित स्वार्थलोलूप जीवनवृत्ती अधर्माकडे झुकली असल्यामुळे समाजाला विनाशाकडे नेणारी असते. आणि समोर स्पष्टपणे विनाश दिसत असतांना चिंतनशील माणूस सौंदर्याचा भोगलोलूप आस्वाद घेण्यापासून अलिप्त झाला तर ती निराशा न मानता, धर्मकर्तव्याच्या पूर्तीसाठी झुकलेली महापुरूषाची जीवनवृत्ती मानली पाहिजे. याच धर्मकर्तव्याच्या पूर्तीसाठी झुकलेल्या मनाचे दर्शन 'पारवा' या कवितेतून घडते. त्याअर्थी ते धर्म-हासाचे वेदना गीत होय. हे वेदनागीत त्यांच्या सौंदर्यवेधी वृत्तीच्या विरोधात नाही. कारण सत्य शीव आणि सौंदर्यावर प्रेम करणारे मन जर त्याला त्याच्यासमोर सत्य, शीव आणि सौंदर्याच्या भावी नाशाचे दर्शन घडवित असेल तर त्याला वेदना होणे स्वाभाविक आहे. म्हणूनच ही वेदनाही जगाच्या सौंदर्याच्या शाश्वत अस्तित्वाच्या मनोकामनेतून व्यक्त झालेली वेदना आहे. ही वेदना म्हणजे ही सौंदर्यभोगवृत्तीपासून दूर गेलेली तात्पुरती मानसिकता आहे. कारण या वेदनेमागे सत्य–शीव आणि सौंदर्याचे जगाला चिरंतन मंगल दर्शन व्हावे यासाठी केलेली आराधना आहे. म्हणूनच बालकवींच्या कवितेत एकीकडे प्रसन्नता व दुसरीकडे जी उदासिनता दिसते. ती वरपांगी कितीही विरूद्ध टोकाची दिसत असली तरी जगाला कायम प्रसन्न राहता यावे या इच्छेपोटीच जन्माला आलेली उदासीनता असते. पारवा कवितेतील पारव्याचे मन अस्वस्थ आहे. याचे कारण त्याला धर्म-हासामुळे भावी काळात मानव सौख्यानंदाचा उपभोग घेवू शकणार नाही, याची जाणीव त्याला झाली आहे.

पारवा कवितेतील प्रतिमासृष्टी आणि पारव्याचे मन –

पारवा कवितेची सुरवात ही त्यांच्या इतर निसर्ग कवितांप्रमाणेच एका शब्द चित्राने होते. हे शब्दचित्र एका धर्मशाळेचे आहे –

''भिंत खचली कलथून खांब गेला
जुनी पडकी उद्धस्त धर्मशाळा
तिच्या कौलारी बसून पारवा तो

खिन्न निरस एकांतगीत गातो''

या पहिल्या कडव्यातच कवितेच्या संपूर्ण आशयाची पार्श्वभूमी आली आहे. या पार्श्वभूमीवरच पुढील कडव्यांची अर्थपूर्णता आहे. या कडव्यातील 'धर्मशाळा' आणि 'पारवा' हया दोन प्रमुख प्रतिमा आहेत. धर्मशाळा ही केवळ जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरूंचे विश्रांती स्थान एवढया मर्यादित अर्थाने विचारात घेण्याची प्रतिमा नसून; या प्रतिमेला फार व्यापक अर्थ अगदी सहजतेने दिला आहे. मोजक्या व नेमक्या शब्दात व्यापक आशयाला गवसणी घालणे, हे खऱ्या शक्तिमान कवितेचे लक्षण असते. ते लक्षण धर्मशाळा हया प्रतिमेतून अनुभवाला येते.

इथे धर्मशाळा या शब्दाचा विग्रह करूनच अर्थ घ्यावा लागतो. धर्मशाळा म्हणजे 'धर्मसाधनेचे केंद्र.' त्यातही धर्म हा शब्द इथे अधीक स्पष्ट होणे आवश्यक आहे. तेव्हाच या 'धर्मशाळेची खचलेली भिंत, कलथून गेलेला खांब' या प्रतिमा स्पष्ट होवू शकतील.

धर्माचा खरा अर्थ आणि धर्मशाळा :–

'धारणात धर्म इत्याहू, धर्मो धारयती प्रजा'

अर्थात ज्या गोष्टीमुळे जगाची धारणा होते; म्हणजेच ज्या गोष्टीमुळे जग टिकून राहते त्या सर्व गोष्टी म्हणजे धर्म होय. मूलतः धर्म ही संकल्पना अतिशय व्यापक असून त्या अर्थाने धर्मसाधना झाली नाही तर समाजात विनाशकारी विकृती येणे अपरिहार्य असते. म्हणूनच भारतीय समाजजीवनात धर्म हा शब्द अनेक ठिकाणी रूजला आहे. दारावर भीक मागायला येणारा भिकारीही 'धर्म करा वो बाई' असे म्हणून आपणाला हे सांगत असतो की, मी उपाशी आहे. मी तुमच्याच समाजाचा घटक आहे. मी उपाशी असतांना तुम्हाला पोटभर ढेकर देत जेवण्याचा अधिकार नाही. त्याच्या हया बोलण्यात त्याच्याही नकळत एक गर्भित धमकी असते. त्या धमकीत ''बुभुक्षितः किं न् करोती पापम्'' हे व्यवहारसूत्र दडलेले असते. मी उपाशी राहिलो तर चौर्य कर्माकडे वळीन आणि जगात चोरांची संख्या वाढली तर तुम्ही आपल्या घरी सुखाने कसे राहू शकाल ? त्याअर्थीच 'धर्म करा वो बाई' हा वाक्यप्रयोग खूप काही शिकवून जातो. 'तुम्हीही जगा व मलाही जगू द्या' हा संकेत जणू त्यात असतो. एकूणच धर्माचे रक्षण म्हणजे आपल्या शाश्वत सुखाची ग्वाही असते. म्हणून हे धर्मपालनही दूरगामी स्वार्थसाधनाच असते व ही स्वार्थसाधना संकुचित नसल्यामुळे ती समर्थनीय असते.

आपण स्वीकारलेली जीवनमूल्येही धर्माचाच भाग असतो.युगधर्माचा भाग म्हणून विशेष परीस्थितीत मूल्य म्हणून स्वीकारलेल्या गोष्टीचा क्षणिक त्यागही धर्माचाच भाग असतो. एवढेच की आपण त्याला नुसतेच धर्म न म्हणता आपद्धर्म म्हणतो. पण आपद्धर्म हा स्वभावधर्म झाला तर तो विनाशकारी अधर्म ठरतो. धर्मसाधना ही प्रदीर्घ काळासाठी फायद्याची तर अधर्माचरण हे तत्कालीन फायद्याचे व दीर्घकाळात नुकसानीचे असते. त्याअर्थीच स्वामी विवेकानंद म्हणतात – 'Sincerity is more paying; but people do not have patientce to practice it.' विवेकानंदाचा हा विचार म्हणजे धर्मविचारच आहे. ते एक जीवनमूल्य आहे. या मूल्यांशी तडजोड फक्त आपद्धर्म म्हणूनच होवू शकतो. आपद्धर्म म्हणून केलेली तडजोड ही धर्मसुसंगतच असते. एकूणच धर्मविचार किंवा धर्मसंकल्पना आमच्या जीवनात सहज मुरलेली संकल्पना आहे. म्हणून तर शरीरधर्म, कुटुंबधर्म, मातृधर्म, पितृधर्म, पुत्रधर्म, समाजधर्म, राष्ट्रधर्म आणि विश्वधर्म असे कितीतरी शब्द आमच्या समाज जीवनात सहज रूजून गेले आहेत.

वरील धर्म या शब्दाच्या व्यापक अर्थाने आपले संपूर्ण समाज जीवन हे धर्मसाधनेचे केंद्र आहे. म्हणून आपला समाज हीच धर्मशाळा आहे. विज्ञान युग आणि औद्योगिकरणाला आपण आधुनिक युग असे संबोधले. या आधुनिकीकरणाने भारतीय समाजजीवनाचा चेहरा–मोहराच बदलला. भौतिक सुख साधनांची रेलचेल झाली. भौतिक दृष्टीने मानवी जीवन अधिक सुखी झाले. पण भौतिक साधनांच्या प्रभावात आम्हाला आमच्या जीवनमूल्यांचा विसर पडला. पाप–पूण्य हा संकल्पना गळून पडल्या. निसर्गाची नियंत्रक शक्ती म्हणूनही परमेश्वरावरचा विश्वास उडाला. नव्या वैज्ञानिक शोधांनी जणू मानवच प्रति परमेश्वर झाला आहे या अविर्भावात तो वावरू लागला. त्यातून परमेश्वर नावाच्या शक्तीचा धाकच संपला. माणूस स्वैर वागू लागला. तो अतिरेकी भोगवादाच्या मागे लागला. स्वार्थ साधनेसाठी वाटेल ते व्यवहार तो करू लागला. यातून माणूसकीचा लोप झाला. समाज जीवनाची ही स्थिती म्हणजेच धर्मशाळा उध्वस्त होणे होय. ही धर्मशाळा मानवाने स्वीकारलेल्या पाप–पुण्याच्या खांबाच्या आधारावर तोलून राहते. हा पाप पुण्याचा खांबच कलथून गेला आहे. त्यामुळे ज्या धर्माच्या चौकटीत मनुष्याने स्वतःला नियंत्रित जीवन जगण्यास बाध्य केले होते. त्या मोडकळीस आलेल्या चौकटी म्हणजेच धर्मशाळेच्या भिंती खचल्या आहेत. म्हणूनच कवी 'भिंत खचली कलथून खांब गेला' असे म्हणतो.

यापुढची ओळ – 'जुनी पडकी उद्धस्त धर्मशाळा' अशी आहे. या धर्मशाळेला जुनी पडकी हे कवीने लावलेले विशेषण महत्त्वाचे आहे. कारण परंपरेने चालत आलेल्या धार्मिक नीतिमूल्यांचे युगधर्मानुकूल पुनर्प्रस्थापन करण्याची जवाबदारी धर्मधुरीणांची असते. पण हे प्रस्थापित धर्मधुरीन स्वतःच्या स्वार्थसाधनेसाठी युगधर्माचे आवाहन दुर्लक्षित करतात. त्यामुळे धर्म केवळ एक आंधळे कर्मकांड ठरते. अशावेळी समाजहीतचिंतक तत्ववेत्ते मात्र अस्वस्थ होतात. धर्माच्या युगानूकूल पुनर्प्रस्थापनेचे तत्त्व त्यांना अस्वस्थ करते. पण धर्मऱ्हासाची स्थिती अतिशय परकोटीला पोहचलेली दिसते. अशा वेळी समाजहितासाठी अंतःकरणापासून तळमळणारे मन अस्वस्थ होते. त्याला जगाच्या कोणत्याच व्यवहारात रस वाटत नाही. तो एकाकीपणे युगानुकूल धर्मतत्त्वाचा उद्घोष करतो. त्याचा हा उद्घोष स्वार्थ साधनेत रत असणाऱ्यांना निरर्थक वाटतो. बहुसंख्य भोग लोलुपांना त्यांचा तत्त्वघोष निरस वाटतो. तरिही तो स्वतःच्या अंतःप्रेरणेने तत्त्वघोष करीतच असतो. अशा समाजहीतचिंतकाच्या मनःस्थितीचे प्रतिक म्हणजे पारवा पक्षी होय.

साऱ्या जगाने धार्मिक नीतिमूल्ये सोडली तरी तो युगधर्म ओळखून; मानवमात्रांच्या चिरंतन कल्याणावर दृष्टी ठेवून धार्मिक नीतिमूल्यांच्या आश्रयानेच राहतो. त्या तत्त्वचिंतकाची भावस्थिती कवीने –

''तिच्या कौलारी बसून पारवा तो
खिन्न निरस एकांत गीत गातो''

या काव्यपंक्तीतून व्यक्त केली आहे. त्याची ही जगावेगळी वागण्याची रीत व जगावेगळी भावस्थिती कवी भविष्यातील विनाशकारी वास्तवाकडे दुर्लक्ष करून, बेफिकीर भोगलोलूप जीवन जगणाऱ्यांच्या, जीवन व्यवहाराचे वास्तव दर्शन घडवून, कवी अधिक गडद करतात. असे बेफिकीर आयुष्य जगणाऱ्यांचे प्रतिक म्हणजे भर दुपारी भक्षाच्या शोधार्थ आकाशी मंडलाकार फिरणारी घार आहे. उन्हाळयाच्या दिवसात हिरव्यागर्द पानांच्या शांत सावल्यात सुखाने साखर झोपेत पेंगणारे पक्षी आहेत. कवी इथे निसर्गातील उन्हाळयाच्या दिवसात दृष्टीस पडणारे चित्र अगदी सहजतेने रेखाटतो व म्हणतो –

''सूर्य मध्यान्ही नभी उभा राहे
घार मंडल त्याभवती घालिताहे,
पक्षि पानांच्या शांत सावल्यात
सुखे साखर झोपेत पेंगतात''

या कडव्यातील 'घार' व 'पक्षी' हया प्रतिमा बेफिकीर भोगलोलूप व केवळ संकुचित स्वार्थकेंद्री आयुष्य जगणाऱ्यांचे प्रतीक आहेत. या भोगलोलूप स्वार्थकेंद्री बेफीकीर आयुष्य जगणाऱ्यांच्या पार्श्वभूमीवरच पारव्याचे वेगळेपण उठून दिसते.

''तुला नाही परि हौस उडायाची
गोड हिरव्या झुबक्यांत दडायाची,
उष्ण झळया बाहेर तापतात
गीतनिद्रा तव आत अखंडित''

आपत्काळात खरेतर कोणालाच सुखासीन जीवन जगण्याचा अधिकार निसर्गानेच दिलेला नसतो. पण हे कोणासाठी ? तर फक्त ज्याला आपत्तीचे विवेकपूर्ण बुद्धिनिष्ठ भान आहे; त्यांच्यासाठीच खरे असते. खरे तर तत्त्वचिंतकांनाही मूळात उपभोगाचा तिटकारा नसतो. ते अरसिकही नसतात पण त्यांच्या चिंतनशील समाजकल्याणकारी वृत्तीमूळे ते अस्वस्थ असतात. त्यामुळेच ते सुखासीनतेचा व भोगलोलूपतेचा त्याग करतात. अशा समाजकल्याणकारी विचार करणाऱ्या तत्त्वचिंतकाचे मन कसे असते याचे दर्शन,

'तुला नाही परी हौस उडायाची
गोड हिरव्या झुबक्यांत दडायाची'

या काव्यपंक्तीतून घडते. आपल्या आयुष्यात स्वीकारलेल्या ध्येयासाठी ही माणसे खडतर व्रत आचरण करीत असतात. स्वतःच्या देहाला वाटेल तसे कष्ट ते देतात. पण ही माणसे देहभान विसरून काम करणारी असतात. आपल्या कार्यासाठी त्यांनी संपूर्णपणे स्वतःला झोकून दिले असते. त्यांचे हे संपूर्ण समर्पण –

''उष्ण झळया बाहेर वाहतात
गीतनिद्रा तव आत अखंडित''

या काव्यपंक्तीतून व्यक्त होते. यातील गीतनिद्रा ही तत्त्वचिंतनाची स्थिती आहे. पण या तत्त्वचिंतकाकडे पाहून इतरेजनांना मात्र वाटत असते की, त्यांच्या आयुष्याचे काहीतरी सूत्र विस्कटले आहे. त्यांची गंभीरता पाहून त्यांचे प्राकृतिक स्वास्थ बिघडल्याची शंका सहजपणे इतरांच्या मनात येवून जाते. व कोणी आस्थेवाईकपणे त्यांच्या प्राकृतिक स्वास्थाची चौकशीही करतात. तशीच आस्थापूर्ण चौकशी कवी इथे पारव्याला करतो. व म्हणतो की–

'चित्त किंवा तव कोवळया विखारे
दुःखत खुपते का सांग, सांग बरे !
तुला काही जगतात नको मान
गोड गावे मग भान हे कुठून ?'

यातील पहिल्या दोन ओळी म्हणजे पारव्याची आस्थापूर्ण चौकशी आहे. तर पुढील दोन ओळी म्हणजे तत्त्वचिंतकाच्या भूमिकेत असलेल्या पारव्याच्या त्यागपूर्ण जीवनाचा सूचक गौरव आहे. अशी मानसे व्यक्तिगत मानसन्मानासाठी म्हणून कोणतेही कार्य करीत नाही. तर जनकल्याणाविषयची प्रामाणिक धडपड हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख असते, ही ओळख –

'तुला काही जगतात नको मान
गोड गावे मग भान हे कुठून ?'

या काव्यपंक्तीतून पटते.

एकीकडे समाजकल्याणकारी तत्त्वचिंतक सद्हेतूने प्रेरित होवून स्वतःचे आयुष्यपणाला लावतात; पण समाजावर मात्र त्यांच्या त्यागमय जीवनाचा आणि तत्त्वचिंतनाचा काही परिणाम होतांना दिसत नाही. त्यावेळी निराशा, पदरी पडण्याची शक्यता असते. महाभारतातही धर्मराज युधिष्ठीर म्हणतो –

'उर्ध्व बाहू विरोमेष्य
न च कश्चित श्रृणोती मे
धर्माद् अर्थश्च कामश्च
किं न सेव्यते नराः''

हा महाभारतातील धर्मराजमुखे व्यक्त झालेला प्रश्न इथे महत्वाचा ठरतो. धर्मराज म्हणतो मी दोन्ही हात उंचावून धर्माचे महत्त्व प्रतिपादन करतो. पण कोणीच माझे म्हणणे ऐकत नाहीत. वास्तविकतः धर्मामुळेच अर्थ आणि काम प्राप्त होत असतात; असे असतांना मानसे धर्माचे पालन कां करीत नाही. धर्मपालन झाले नाही तर; विनाश अटळ असतो. एकूणच धर्मऱ्हासाची जाणीव कवी मनात प्रबल झाली आहे; व या धर्मऱ्हासाच्या जाणीवेची वेदना कवी पुढे व्यक्त करतांना म्हणतो –

''झोप सौख्यानंदात मानवाची
पुरी क्षणही कोठून टिकायची ?
दुःखनिंद्रे निद्रीस्त बुद्धराज
करूणगीते घुमवीत जगी आज''

अर्थातच धर्मऱ्हास होत राहिला तर; मानवी आयुष्यातील सुखालाच ग्रहण लागेल. ज्या क्षणिक सुखाच्या लालसेने मनुष्य धर्म त्याग करतो किंवा धर्म सोडून व्यवहार करतो. त्या सुखाचाच नाश दीर्घ काळात धर्मऱ्हासाने होतो. 'जो धर्माचे रक्षण करील, त्याचेच धर्म रक्षण करील' हे तर विश्वातील शाश्वत सत्य आहे. या सत्याकडेच डोळे झाक केली तर त्याचे परिणाम भोगावेच लागतील. प्रत्येक व्यक्ती हा ज्याच्या त्याच्या कृत्यासाठी स्वतःच जवाबदार असतो. म्हणूनच व्यक्तीने स्वतःच स्वतःच्या आयुष्याला नित्य चिंतनातून आकार द्यायचा असतो. त्याने केलेल्या चुकांची शिक्षा काळच त्याला देत असते. म्हणून स्वतःच्या चुकांचेही कठोर आत्मपरीक्षण करता आले पाहिजे. त्याने केलेल्या पापात अन्य भागीदार व्हायला तयार नसतात. सुखाचे सर्व साथी असतात, दुःखाचे कोणीही साथी नसतात. हा अनुभव वाल्मिक ऋषींनी घेतला. त्या अनुभवातून ते अंतर्मुख झाले. माझ्या पापाचे भागीदार कोणीच नाहीत. माझ्या भरवशावर सुखोपभोग घेणारी बायकामुलेही नाहीत. या अनुभूतीतून त्यांचा पुनर्जन्म झाला, वाल्याचा – वाल्मिकी झाला. पण हा अपवाद झाला; नियम नव्हे. फार कमी माणसे हया जाणीवेने अंतर्मुख होवून जीवनाला वळण देतात – ज्यांना वळण देता येते त्यांचे आयुष्य बदलून जाते. पण सर्व साधारणपणे समाजात असे चित्र फार क्वचित दिसून येते. त्यामुळे समाजाचा विनाशही अटळ असतो. या अटळ विनाशाची वेदना समाजहीतचिंतकाला अस्वस्थ करते. म्हणूनच कवी पारव्याच्या निमित्ताने –

''झोप सौख्यानंदात मानवाची
पुरी क्षणही कोठून टिकायची ?''

असा प्रश्न उपस्थित करतात. हा प्रश्न म्हणजेच धर्मऱ्हासाची वेदना आहे. या वेदनेतून भगवान गौतम बुद्धाचा जन्म झाला. त्याचा जन्माला एक नवा अर्थ प्राप्त झाला. तो सिद्धार्थ झाला. अर्थातच त्याच्या जन्माचा अर्थ सिद्ध झाला. सारी सुखे पायाशी लोळण घालत असतांनाही त्याविषयी ते अनासक्त झाले. म्हणूनच कवीने–

'दुःखनिद्रे निद्रिस्त बुद्धराज'

असे म्हटले आहे. भगवान बुद्धाला जगाच्या उद्धाराची तळमळ आहे. त्यांच्या मनात जगाविषयी अपार करूणा आणि प्रेम आहे. आणि त्या प्रेमापोटीच त्यांनी जगतकल्याणाचा मार्ग सांगितला आहे. त्याने सांगितलेला जगत्कल्याणाचा मार्ग म्हणजेच जगाच्या करूणेतून निर्माण झालेली गीते आहेत. बुद्धाने आत्यंतिक करूणेने 'धम्मम् शरणम् गच्छामी' चा मार्ग सांगितला. हे मानवा 'तू धर्माला शरण जा !' हाच बुद्धाच्या आयुष्याचा खरा संदेष आहे. धर्मविजयासाठी बुद्धीनिष्ठ विचारसरणी आवश्यक आहे. या बुद्धिनिष्ठ विचारसरणीत आंधळी श्रद्धा नसते तर युगधर्माचे जागृत भान असते; व युगधर्म हा कालमान परिस्थितीच्या यथोचित आकलनातून कळत असतो. धर्माचे पालन जसे व्यक्तिगत पातळीवर करायचे असते; तसेच समूह पातळीवरही करायचे असते. एका व्यक्तीने कितीही चांगले राहून समाजोद्धार; राष्ट्रोद्धार व पर्यायाने विश्व कल्याण करणे संभवनीय नाही. मोठया कार्यासाठी संघटीत प्रयत्नांचीच आवश्यकता असते. त्यात व्यक्तिगत अहंकाराला बुद्धिनिष्ठ जाणीव ठेवून बाजूला ठेवायचे असते. म्हणूनच बुद्धदेव 'संघम् शरणम् गच्छामी' असे म्हणतात. बुद्धदेवाच्या करूणगीतांच्या वरील कडव्यातील उल्लेखाच्या संदर्भात हे त्रिशरण लक्षात घेतले पाहिजे. या त्रिशरणवृत्तीने मानवाने वागण्यातच त्याचे परमकल्याण असते.

जगतकल्याणाच्या तळमळीने सारेच महापुरूष बुद्धदेवाच्या वेदनेची पातळी गाठतात. त्यातूनच कुणी क्रांतिकारक जन्माला येतो तर कुणी आत्यंतिक अहिंसेचा पुजारी महात्मा गांधी बनतो. क्रांतिकारक ते अहिंसेचा पुजारी महात्मा गांधी ही दोन टोके वेगवेगळी वाटतात. पण त्यांच्या कार्यप्रेरणेचे अंतःसूत्र मात्र एकच असते. ते अंतःसूत्र म्हणजे मानवमात्राचे व्यापक कल्याण हेच होय. बुद्धाने स्वेच्छेने सुखनिद्रेचा त्याग केला व त्याला दुःखनिद्रेचा अनुभव घ्यावा लागला. हीच दुःखनिद्रा पारवारूपी समाजहीतचिंतक महापुरूषाला लागून राहिलेली आहे. म्हणून कवी पारव्याला उद्देशून म्हणतात –

''दुःखनिद्रा ती आज तुला लागे;
तुझे जगही निद्रीस्त तुझ्या संगे''

अशी माणसे आत्यंतिक चिंतनामुळे आपल्याच तंद्रीत वावरतांना दिसतात. त्यामुळे यांना कुणी वेडेही म्हणतात, ते असतातही वेडे, पण ते ध्येयवेडे असतात. त्यांची स्वतःच्या तंद्रीत वावरण्याची ही स्थिती –

'तुझे जगही निद्रीस्त तुझ्या संगे'

या काव्यपंक्तीतून अगदी चपखलपणे व्यक्त झाली आहे.

महापुरूषांच्या अशा मनःस्थितीमध्ये एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिगत दुःखाला तेवढे महत्व नसते. त्याच्या मनात समाजाच्या व्यापक कल्याणाची तळमळच तीव्र असते. वास्तविक व्यक्तिगत दुःखाची गाऱ्हाणी दुर्लक्षणीय नसतात. पण व्यक्तिगत दुःखाच्या गाऱ्हाण्यांपेक्षा सामुहिक दुःखाची गाऱ्हाणी महापुरूषाला जास्त महत्वपूर्ण वाटतात. कारण व्यक्तिगत दुःखाच्या गाऱ्हाण्याचे मागेही समाजाचे अधर्माचरणी नैतिक अधःपतनच कारणीभूत असते. समाजाला धर्मशील करण्यासाठी त्याची धडपड असते. म्हणूनच कवी व्यक्तिगत दुःखाचा उल्लेख –

'फिरे माझ्या जगतात उष्ण वारे'

या ओळीतून व्यक्त करतात व या दुःखाकडे लक्ष द्यायला या पारव्याला वेळच नाही म्हणून –

'तुला त्याचे भानही नसे बारे !'

या काव्यपंक्तीने कवितेचा शेवट होतो. सामुहिक दुःखाच्या परिमार्जनाचा उपाय एकच, तो उपाय म्हणजे समाजात धर्म जाणीव प्रवर्तीत करणे. ही धर्म जाणीव प्रवर्तीत झाली की, व्यक्तिगत दुःखाच्या शमनाची उत्तरेही त्यातून मिळून जातात.

कवितेच्या शेवटी 'अपूर्ण' अशी टिप्पणी लिहिली आहे. अर्थातच वाचकाला कविता अपूर्ण वाटत नाही. पण कविमनाला मात्र आपणाला अजून खूप काही सांगावयाचे होते, ते राहून गेले याची जाणीव आहे. या जाणिवेतूनच अपूर्ण हा शेवटचा उल्लेख आहे. हा उल्लेखही कवीची वेदना अधिक तीव्र करणारा आहे. एकूणच बालकवींची पारवा ही कविता म्हणजे धर्म-हासाचे वेदनागीत आहे.

निष्कर्ष –

1)पारवा या कवितेच्या गूढतेचे आकलन, पारवा कवितेतील विविध प्रतिमांच्या आकलनाद्वारे शक्य आहे.
2)धर्मग्लानीमुळे उद्धस्त होवू पाहणाऱ्या समाजहितैषी विचारवंताचे प्रतिक म्हणजे पारवा होय.
3)धर्मशाळा म्हणजे धार्मिक नीतिमूल्यांचे संगोपन करणारी संस्था होय.
4)प्रस्तुत कवितेतील उद्धस्त धर्मशाळा समाजातील धर्म-हासाचे प्रतिक होय.
5)हिरवे गर्द झाड त्या झाडात सुखाने सावलीत बसणारे पक्षी, आकाशात भक्ष्याच्या शोधात उडणारी घार ही सारे आत्मलोलूप, सुखलोलूप, स्वयंकेंद्रित जीवन जगणाऱ्या, मला काय त्याचे ? अशी मानसिकता जोपासणाऱ्या समाजघटकांचे प्रतिक होय.
6)पारव्याने सुखद सावली नसलेल्या, उद्ध्वस्त झालेल्या धर्मशाळेचा आश्रय शोधणे म्हणजे महान ध्येयासाठी हेतूपुरस्पर तपाचरण स्वीकारलेल्या व्यक्तीचे प्रतिक होय.
7)प्रस्तुत कवितेतील बुद्धाचा उल्लेख हा धर्मकार्य सिद्यर्थ, तपाचरण स्वीकारणाऱ्या व त्यासाठी राजवैभवाचा त्याग करणाऱ्या महापुरूषाचा उल्लेख म्हणून होतो.
8)पारव्याला सुद्धा आम्रवृक्षाच्या शितलछायेत सुखेनैव दडून राहण्याची संधी आहे. पण ती त्याने हेतूपुरस्पर नाकारलेली आहे.
9)धर्म-हासामुळे बुद्धाच्या वाटयाला आलेली वेदना आणि पारव्याने स्वीकारलेले जीवन समांतर आहे.
10)एकूणच पारवा कविता ही धर्म-हासाचे वेदनागीत आहे.

संदर्भग्रंथ

1.समग्र बालकवी : संपादक – मंदा आपटे, पहिली श्रेयस आवृत्ती : 2005
2.कविता आणि प्रतिमा : प्रा. सुधिर रसाळ, मौज प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती : 1982
3.संक्षिप्त महाभारत : चिंतामन विनायक वैद्य, तिसरी आवृत्ती : 1912

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org